# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२० / फाल्गुन २३, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(४) ग्रामविकास मंत्री**<br>**(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री**<br>**(६) महिला व बालविकास मंत्री**<br>**(७) मृद व जलसंधारण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोचरी-ढाफळेवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) धरणास मंजुरी देण्याबाबत

**(१) * ८२४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोचरी-ढाफळेवाडी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या गावाला आजतागायत टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावाची लोकसंख्या ४ हजाराहून अधिक असल्याने तेथे तीव्र पाणी टंचाई भासत असल्याने याठिकाणी धरण झाल्यास १ ते २० हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरुपी सोडविली जाईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोचरी-ढाफळेवाडी धरणास मंजुरी देण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अशंत: खरे आहे.

कोचरी-ढाफळेवाडीला टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत नसून कोचरी गावाला टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर योजना पूर्ण झाल्यानंतर सदर गावातील ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे.

(३) सदर योजनेस दिनांक ७.६.२०१४ च्या निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर महामंडळाकडील आर्थिक दायित्व मर्यादित करण्याच्या हेतूने सदर योजनेची प्रशासकीय मान्यता महामंडळाच्या ४९ बैठकीमध्ये रद्द करण्यात आली. सदर योजनेची प्रशासकीय मान्यता रद्द न करणेबाबत लोकप्रतिनिधींची मागण्या, टंचाई परिस्थिती इ. बाबी विचारात घेऊन महामंडळाच्या ५० व्या बैठकीमध्ये सदर योजनेची आवश्यकता तपासून नव्याने प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन सदर योजनेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु मृद व जलसंधारण विभागाची सन २०१८-१९ ची दरसूची अंमलात आल्याने सदर दरसूचीनुसार अंदाजपत्रक अद्ययावत करुन मंजूरीसाठी फेरसादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ली-घोणसरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना नवीन ग्रामपंचायतीसह नागरी सुविधा देण्याबाबत

**(२) * ६७६१ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ली-घोणसरी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्तांचे नविन कुर्ली वसाहत फोंडाघाट येथे १९९६-९७ मध्ये पुनर्वसन केलेले असताना प्रकल्पग्रस्तांना मागील १० वर्षाहून अधिक कालावधीपासून रस्ते, पाणी, शाळा व समाजमंदिर आदि मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुर्ली-फोंडाघाट प्रकल्पग्रस्तांना नवीन ग्रामपंचायत मिळण्याबाबत मागील अनेक वर्षांची मागणी असुन ग्रामपंचायती अभावी प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्तांना नवीन ग्रामपंचायतीसह मुलभूत सोयीसुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे. १३ नागरी सुविधा सदर पुनर्वसित गावठाणामध्ये उपलब्ध करून दिलेल्या आहेत.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे. कुर्ली ग्रामपंचायत स्थापना करणेबाबतचा प्रस्ताव प्रक्रियेत असून फोंडा ब्रम्हनगरी वसाहत व नवीन कुर्ली वसाहत येथे १३ नागरी सुविधा पुर्ण करण्यात आल्या आहेत.

-----------------

## जत (जि.सांगली) तालुक्यात कृषी विभागाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३) * ७८७ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यात कृषी विभागाच्या शेडनेट, पॉली हाउस, नाला खोलीकरण व रुंदीकरण या कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन याबाबत मा.कृषी मंत्री, आयुक्त व विभागीय संचालकांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निगडी खुर्द (ता.जत, जि.सांगली) येथे कृषी विभागांतर्गत महात्मा फुले जल व भूमी संधारण अभियान सन २०१५-२०१६ मध्ये झालेल्या कामांमध्ये व मौजे धुळकरवाडी (ता.जत, जि.सांगली) येथील नाला

खोलीकरण कामांमध्ये उपविभागीय कृषी अधिकारी,तालुका कृषि अधिकारी व ठेकेदार यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असुन याबाबत तेथील नागरीकांनी व सामाजिक संघटनांनी  जिल्हाधिकारी, सांगली, जिल्हा कृषि अधिक्षक, सांगली यांचेकडे तक्रारी करुन दिनांक १८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास बेमुदत उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यावहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

याप्रकरणी संबंधित तत्कालिन तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व कृषी सहायक यांचेकडून रक्कम रु. ९,९७,३३२/- वसूल करुन घेण्यात आली असून आयुक्त (कृषी) यांचे दिनांक २४.०८.२०१८ च्या आदेशान्वये त्यांना शासन सेवेतून निलंबित करुन प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलडाणा) प्रकल्पातील गावांच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावाबाबत

**(४) * २३९४ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेनटाकळी (ता.मेहकर, जि.बुलडाणा) प्रकल्प चतुर्थ सुप्रमा प्रस्तावाबाबत दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या १३७ व्या बैठकीत निर्णय झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाणमोड, मानमोड, करतवाडी व इतर मान्य गावांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत असलेला सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी अधीक्षक अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, जलसंधारण प्रकल्प व समन्वय विभाग (ज.स.प्र.व.की.) यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर गावांचे पुनर्वसनाबाबत समावेश केलेला सुप्रमा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. ९६४४ दिनांक २४/१२/२०१९ अन्वये राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समितीच्या १३७ व्या बैठकीतील चतुर्थ सुप्रमा प्रस्तावावरील छाननी अहवालातील मुद्दा क्र.२७ चे अनुपालन अहवाल प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकल्पाचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव दिनांक ३१/०१/२०२० रोजीच्या त्रिसदस्यीय सचिवस्तरीय उपसमितीच्या बैठकीत सादर करण्यात आला असता, त्यावर सदर समितीने दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मुर्तवडे-वारेली-कातळवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याबाबत

**(५) * १३२७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुर्तवडे-वारेली-कातळवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या ग्रुप ग्रामपंचायतीचे कार्यालय मौजे मुर्तवडे येथे असून यामध्ये समाविष्ट असलेले वारेली हे गाव मौजे मुर्तवडे येथून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असल्याने या गावा दरम्यान दळणवळणाच्या कोणत्याही सोयी नसल्याने ग्रामपंचायतीशी निगडीत कामांसाठी वारेली येथील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करून खास बाब म्हणून मौजे वारेली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ व २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली असतानाही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे वारेली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) शासन निर्णय क्र.व्हीपीएम २६०३/प्र. क्र.१५४४/पं.रा.४ (२२) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार ज्या महसुली गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची असेल त्या गावाची लोकसंख्या एक हजार असणे आवश्यक आहे. केवळ अपवादात्मक प्रकरणात (उदा. आदिवासी व तांडा या भागांसाठी किंवा दोन गावात जर ३ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असेल) तर त्या भागाकरिता किमान लोकसंख्या दोन हजार असणे आवश्यक आहे.

मुर्तवडे ग्रामपंचायत अंतर्गत वारेली या महसुली गावाची लोकसंख्या ४३७ इतकी असून लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने सदर महसुली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतची कार्यवाही करता येत नाही.

सदर विषयाबाबत मा.लोकप्रतिनिधीच्या दिनांक ०३/०८/२०१७ व दिनांक २९/०८/२०१८ रोजींच्या पत्राच्या अनुषंगाने अनुक्रमे शासनपत्र दिनांक

२२/०६/२०१८ व १५/१०/२०१८ अन्वये तसेच दिनांक १५/१२/२०१७ रोजीच्या औचित्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने मा. विधानसभा सदस्य यांना दिनांक २१ जून, २०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) येथील पंचायत समितीची इमारत व कर्मचारी निवासस्थाने हस्तांतरीत करण्याबाबत

**(६) * ४६३५ श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (जि.हिंगोली) येथे लाखो रुपये खर्च करुन पंचायत समितीची इमारत व कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम सन २००६ मध्ये केले असतानाही मागील १३ वर्षापासून कर्मचारी निवासस्थाने कर्मचाऱ्यांना हस्तांतरीत केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असुन जिल्हा परिषद विभागाकडून हस्तांतरीत करण्यास विलंब होत असल्याने या कामाची चौकशी करण्याची मागणी समाजसेवी नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

नवनिर्मित पंचायत समिती सेनगाव (जि.हिंगोली) नवीन प्रशासकीय इमारत व निवासी इमारतीचे बांधकाम दिनांक ३० जून, २००६ रोजी पूर्ण झालेले आहे. पंचायत समिती प्रशासकीय इमारतीमध्ये काम पूर्ण झालेनंतर सदर इमारतीमध्ये पंचायत कार्यालय कार्यरत आहे. सदर प्रशासकीय इमारत हस्तांतर करण्यापूर्वीच पंचायत समिती कार्यालयाचे कामकाज सुरू करणे आवश्यक असल्यामुळे पंचायत समिती कार्यालय कार्यरत करण्यात आले. निवासी इमारतीमध्ये पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा या सोयी सुविधा नसल्यामुळे सदर निवासी इमारतीचे हस्तांतरण करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

प्रस्तुत कामाबाबत चौकशी करण्याची मागणी समाजसेवी नागरिकांकडून करण्यात आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील उजनी धरणाच्या फुगवटा क्षेत्रात बुडीत बंधारे बांधणेबाबत

**(७) * ६८०२ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील देऊळगावराजे, पेडगाव, वाटलुज, हिंगणीबेर्डी, नायगाव, राजेगाव व खानोटा या भागातील शेतकऱ्यांची शेतीची सिंचन योजना या उजनी धरणाच्या फुगवटा क्षेत्रावर अवलंबून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी बुडीत बंधारे बांधणेबाबत लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा मागणी करून देखील अद्याप बंधाऱ्यांचे काम होऊ शकले नाही, हे ही खरे हे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी बुडीत बंधारे बांधणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता बुडीत बंधारे / बंधाऱ्यांची श्रृंखला इत्यादी पर्याय सुचविणे व बांधकामे हाती घेण्याकरीता मानके निश्चिती करण्यासाठी जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.१३/११/२०१९ अन्वये समिती स्थापन करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाकडून राज्याच्या हिश्याची थकीत रक्कम उपलब्ध करुन घेण्याबाबत**

**(८) * ८५० श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून विविध करांपोटी मिळणारा राज्याचा हिस्सा, आपत्ती व्यवस्थापनाने केलेली मागणी आणि वस्तु व सेवा कराची क्षतीपूर्ती या तीन विषयांबाबत केंद्र शासनाकडून राज्याला ४५,०७७ कोटी रुपये येणे बाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन राज्य शासनाने माहे जुलै, २०१९ मध्ये राज्यात आलेल्या पुरामुळे झालेल्या नुकसानीपोटी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास ७२८८.०५ कोटी रुपये नुकसान भरपाईचा प्रस्ताव तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा ७२०७.७९ कोटीचा प्रस्ताव दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडे वरील मोठ्या प्रमाणात थकबाकी रहाण्याची कारणे काय आहेत, सदरहू थकीत रक्कम उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) केंद्र शासनाकडून सन २०१९-२० मध्ये केंद्रीय करातील प्राप्त कर महसुलामध्ये महाराष्ट्र राज्याच्या हिस्याचे अर्थसंकल्पीय अंदाज रु.४४,६७२.२४ कोटी वरुन सुधारीत अंदाजात रक्कम रु.३६,२१९.६४ कोटी इतके निश्चित करण्यात आले आहेत. त्यापैकी फेब्रुवारी २०२० अखेर रू. ३१,१५९.४३ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. उर्वरित निधी मार्च, २०२० मध्ये प्राप्त होणे अपेक्षित आहे.

वस्तु व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीमुळे राज्यांना होणा-या नुकसान भरपाईची रक्कम केंद्र शासनाकडून दर दोन महिन्यांनी राज्य शासनास प्राप्त होते. या आर्थिक वर्षात आर्थिक मंदीमुळे बहुतेक सर्व राज्यांचे, राज्य वस्तु व सेवा कराचे संकलन कमी झाल्यामुळे वस्तु व सेवा कराची नुकसान भरपाईच्या रक्कमेची मागणी वाढली आहे. काही वस्तुंवर आकारण्यात येत असलेल्या उपकराचे संकलन सुध्दा कमी झाले आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून राज्य शासनास वस्तु व सेवा कराची नुकसान भरपाई मिळण्यास विलंब होत आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने दि.१०.१२.२०१९ रोजी मा. केंद्रीय अर्थमंत्री महोदयांना वस्तु व सेवा कराची नुकसान भरपाई तसेच केंद्राकडून राज्याला मिळणारा केंद्रीय करातील हिस्सा लवकरात लवकर देण्याची विनंती करण्यात आली होती.

पुरामुळे व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी राज्याने मागणी केलेल्या रक्कमेपैकी केंद्र शासनाने दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी रू. ९५६.९३ कोटी एवढी मदत मंजूर केली आहे. तसेच प्रलंबित असलेल्या मदतीसंदर्भात दि. ०४ जानेवारी, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने केंद्रीय गृहमंत्री यांना पत्र पाठविले आहे.

-----------------

## पंचाळा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(९) * २९१९ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचाळा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना गत १० वर्षापासुन मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी याबाबत आपले सरकार पोर्टलव्दारे तक्रार दाखल करून मोबदला मिळण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व किती कालावधीत भूसंपादनाचा मोबदला देण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अशंतः खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेअंतर्गत पा.त. पंचाळा या प्रकल्पाला एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर यांचे मार्फत रु. ७०.१६ लक्ष निधीची प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून प्रकल्पावर अद्यापर्यंत रु.७६.१९ लक्ष निधी खर्च झालेला आहे. सद्यस्थितीत भूसंपादनामुळे प्रकल्प किंमतीत वाढ होत असल्याने आणि भूसंपादनाचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अदा करणे आवश्यक असल्याने, जिल्हा जलसंधारण अधिकारी, चंद्रपूर यांचेमार्फत प्रकल्पास नव्याने सुधारित प्रशासकिय मान्यता घेण्याचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाकडे पाठविण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरसोली ते भिलवडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) * २२५३ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरसोली ते भिलवडी (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) रस्ता अतिशय खड्डेमय झाला असून पावसाच्या पाण्यात जलमय होत असल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शिरसोली ते भिलवडी या रस्त्याची मजबुतीकरण व नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) शिरसोली ते भिलवडी हा एकुण ८.७० कि.मी. लांबीचा रस्ता आहे. यापैकी शिरसोली ते चांदुरबिस्वा या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रगतीत असून, सदर काम माहे जून, २०२० पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

उर्वरीत चांदुरबिस्वा ते भिलवडी या रस्त्याचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## किल्लारी (ता.औसा, जि.लातूर) ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार

**(११) * २१५२ श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किल्लारी (ता.औसा, जि.लातूर) येथील १४ व्या वित्त आयोगातील कामाच्या अनियमितता व गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.

(२) व (३) सदर निवेदनानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी जिल्हा स्तरावर चौकशी समिती नियुक्त केली असून सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होताच याबाबत आवश्यकती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालय व ग्रँट मेडिकल महाविद्यालयात तीन हजार शवविच्छेदन व्हिसेरा अहवाल प्रलंबित असल्याबाबत

**(१२) * ६८३५ श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालय व ग्रँट मेडिकल महाविद्यालयात सुमारे तीन हजार शवविच्छेदन व्हिसेरा अहवाल सुमारे सहा वर्षापासून रखडल्याने त्याचा पोलीस तपासावर परिणाम होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शवविच्छेदन व्हिसेरा अहवाल तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी दि. २८.११.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सर ज.जी.समूह रुग्णालये, मुंबई येथील शवविच्छेदन व्हिसेरा तपासणी कामांची विभागणी व इतर बाबींबाबत उच्च स्तरीय समिती गठीत केली असून समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाघोली (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील पाझर तलावाचे प्रलंबीत काम पुर्ण करण्याबाबत

**(१३) * ७४८३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघोली (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील गट न. ४४ व ४५ वाघोली शिवारामध्ये सिंचन विभाग जिल्हा परिषद यांचे मार्फत सर्व्हेक्षण करण्यात येवून पाझर तलावाचे काम घेण्यात आले आणि मंडळ अमरावती येथून तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असतानाही सदर पाझर तलावाचे काम प्रलंबीत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील एक वर्षापूर्वी सदर पाझर तलावाला विभागा मार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असताना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नाशिक येथे प्रस्ताव सादर न केल्याने पाझर तलावाचे काम प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरातील खैरगाव देशमुख इत्यादी गावात दुष्काळ निर्माण झाला असल्याने मंजूर पाझर तलावाचे प्रलंबीत काम पुर्ण करण्याबाबत व या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१), (२) व (३) वाघोली, ता.केळापूर, जि.यवतमाळ येथील गट नं.४४ व ४५ शिवारामध्ये सिंचन विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ मार्फत सर्वेक्षण करुन पाझर तलावाचे काम घेण्यात आले आहे. सदर कामास प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती यांनी रुपये १,४४,२७,२२०/- इतक्या रकमेस दिनांक २८.१२.२०१८ च्या पत्रान्वये तांत्रिक अनुमती प्रदान केली आहे. या कामास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.४.१.२०१९ ठराव क्र.२१, अन्वये रुपये ३,६७,२९,२००/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर प्रकल्पाचा पाणीसाठा १५० स.घ.मी. पेक्षा जास्त असल्याने त्यास मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्याअनुषंगाने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

उप विभागात शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांची पदे रिक्त असल्याने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाला. याकारणास्तव संबंधित कनिष्ठ अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुकडी पाटबंधारे प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याबाबत

**(१४) * ७३८० श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी पाटबंधारे प्रकल्पाला नुकतीच सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाटबंधारे प्रकल्पात श्रीगोंदा-नगर (जि.अहमदनगर) तालुक्यांसाठी वरदान ठरणा-या साकळाई योजनेचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाटबंधारे प्रकल्पासाठी शासनाकडून किती निधीची तरतूद करण्यात आली आहे, तद्अनुषंगाने साकळाई योजनेला किती निधी दिला जाणार आहे, तसेच यामध्ये समाविष्ट असलेल्या डिंभे ते माणिकडोह दरम्यानचा बोगदा काढण्यास शासनाने मान्यता दिली आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

कुकडी पाटबंधारे प्रकल्प, जि. पुणे या प्रकल्पाला जलसंपदा विभाग शासन निर्णय दि.०२/११/२०१८ अन्वये रु.३,९४८.१७ कोटी इतक्या किंमतीची तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.
(२) नाही.
(३) व (४) कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी सन २०१९-२० मध्ये ४० कोटी निधी प्राप्त आहे, परंतु त्यात साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी तरतूद नाही.
डिंभे माणिकडोह बोगदयाचे काम हाती घेण्याच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत सविस्तर सर्वेक्षण व संकल्पन करण्यास शासनाने दि.०७/०८/२०१९ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टोकडे (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील ग्रामपंचायतीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१५) * ६६९३ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टोकडे (ता.मालेगांव, जि.नाशिक) ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भगतसिंग सभा मंडप, संगणक कक्ष, चौक सुशोभिकरणाची कामे झालेली नसतांनाही देयके अदा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, घरकुल वाटप, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत करण्यात आलेली कामे, पिण्याच्या पाईपलाईनच्या कामात देखील गैरव्यवहार झाला असल्याने स्थानिक ग्रामस्थांकडून सदर प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, तथापि ग्रामपंचायतीच्या कामात अनियमितता झाली आहे.
(२) नाही, काम झाल्यानंतरच देयक अदा करण्यात आले आहे.
(३) होय.
(४) याबाबत संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले असून संबंधित सरपंच यांचे विरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ३९ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

तसेच तक्रारदार यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव यांनी केलेली चौकशी मान्य नसल्याने त्रयस्थ समितीची नेमणूक जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) मतदार क्षेत्रातील घरकुल योजनेंतर्गत असलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) * ३१६९ श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रधानमंत्री घरकुल योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास व पारधी आवास घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घराचे बांधकाम करण्याकरिता जागा उपलब्ध नसल्यास अतिक्रमण केलेल्या जागा उपलब्ध करुन देण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या सन २०१८ च्या परिपत्रकानुसार सन २०११ पूर्वीचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे आदेश तसेच ज्या लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध नसेल त्यांना त्या त्या ग्रामपंचायतीमार्फत ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा घरकुल बांधकामासाठी भोगवटा सदरी लावण्याचे आदेश काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही मुक्ताईनगर (जि.जळगाव) मतदार क्षेत्रातील शासन परिपत्रकानुसार कार्यवाही न झाल्याने हजारो लाभार्थी सदर योजनेपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील परिपत्रकांची अंमलबजावणी करुन या वंचित लाभार्थ्यांना तातडीने घरकुल बांधण्याकरिता जागा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील ४७ ग्रामपंचायतीअंतर्गत १०६५ लाभार्थ्यांचे जागा मागणीच्या प्रस्तावांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जळगांव यांनी मंजूरी दिलेली असून याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी सेविका व महिला बचत गटांना डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा निधी अदा करण्याबाबत

**(१७) * ६०४० डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना कुपोषण दूर करण्यासाठी शासनाने सुरु केली असून राज्यातील गरोदर मातांसह स्तनदा माता व अंणवाडीतील कुपोषित बालकांना सकस आहार पुरवठा करण्यासाठी वेळेत आहाराचा निधी मिळत नसल्यामुळे अंगणवाडी सेविका व महिला बचत गटाला उधारीने आहार विकत घेऊन पुरवठा करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण, अंबरनाथ व मुरबाड या विभागात गेली ६ महिने ते वर्षभरापासून ताजा आहर मिळालेला नाही तसेच अंगणवाडी सेविका व महिला बचत गटातील महिलांच्या खात्यात अमृत आहराचा निधीही जमा झालेला नसून टीएडीएची रक्कमही त्यांना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुपोषण कमी करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या सेविकांना व बचतगटातील महिलांना अमृत आहार योजनेचा निधी तात्काळ अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचा माहे जुलै,२०१९ पर्यंतचा निधी हा एप्रिल,२०१९ मध्ये आगाऊ वितरीत करण्यात आला होता. त्यावेळी निधीचे वितरण हे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून होत होते. तथापि, आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २० जुलै,२०१९ च्या शासन निर्णयान्वये या योजनेकरीता निधीचे वितरण हे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात येत आहे. निधी वितरण पध्दतीतील बदलामुळे सप्टेंबर,२०१९ ते डिसेंबर,२०१९ या कालावधीतील निधी वितरणास विलंब झाला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही आदिवासी क्षेत्र असलेल्या शहापूर, मुरबाड, भिवंडी या गटामध्येच चालू आहे. निधी वितरण पध्दतीतील बदलामुळे सप्टेंबर,२०१९ ते डिसेंबर,२०१९ या कालावधीतील निधी वितरणास विलंब झाला आहे. तथापि, जानेवारी २०२० दरम्यान आदिवासी

विकास प्रकल्प कार्यालयाकडून प्राप्त झालेला रु.२.४० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे व दिनांक १३ फेब्रुवारी,२०२० च्या आदेशानुसार योजनेकरीता प्राप्त झालेला रु.३.६० कोटी इतका निधी अंगणवाडयांना वितरीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दाभलोन (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या पाड्यात रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत

**(१८) * ३१०१ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभलोन (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रामपंचायत परिसरात ३७७ कुटुंबांची वस्ती असलेल्या गावांना अद्यापर्यंत रस्ता झाला नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दाभलोन ग्रामपंचायतीच्या सहा पाडयात रस्ते नसल्याने शाळकरी मुलांना जिल्हा परिषद शाळेत जाण्यास, जेष्ठ नागरीक तसेच गरोदर स्त्रियांची रुग्णालयापर्यंत जाण्यास गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दाभलोन ग्रामपंचायतीच्या सहा पाड्यात रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) अशी तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) दाभलोन ग्रामपंचायत हद्दीत एकूण सात पाड्या आहेत.

१) खळीचामाळ व २) पाटीलपाडा- सदरचे दोनही पाडे हे इतर जिल्हा मार्ग क्र.४२ डांबरी पृष्ठभागाच्या रस्त्याने रामा-७२ ला जोडले आहेत. रा.मा.७२ ते दाभलोन या रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरणाचे रक्कम रु.१२१.५० लक्ष रक्कमेचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत प्रगतीत आहे.

३) जांभेपाडा , ४) साखळीपाडा व ५) गुंधनपाडा हे तिन पाडे ग्रामीण मार्ग क्र. १२३ ने जोडण्यात आले आहेत. त्यापैकी जांभेपाडा येथील ०/०० ते ०/७०० कि.मी. रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सन २०१७-१८ मध्ये करण्यात आलेले आहे. तसेच त्यापुढील साखळीपाडा येथील ०/७०० ते १/०० कि.मी. लांबीचे रु.१०.०० लक्षचे डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. गुंधनपाडा येथील १/०० ते १/७०० कि.मी. रस्ता खडी पृष्ठभागाचा आहे

६) राहतेपाडा- हा पाडा ग्रामीण मार्ग क्र. १० वर असून या मार्गाची लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ७०० मीटर लांबीचे डांबरीकरण करण्यात आले असून उर्वरीत १३०० मीटर लांबीचा रस्ता हा मुरुमाचा असून सदर रस्त्याचे काम सन २०२०-२१ च्या आराखड्यात प्रस्तावित करण्यात आले आहे.

७) वांगडपाडा-साखळीपाडा ते वांगडपाडा जोडरस्ता हा ८०० मीटर लांबीचा अवर्गीकृत रस्ता असून मुरम पृष्ठभागाचा आहे. रस्ता अवर्गीकृत असल्याने शासनाच्या योजनेमधून घेता येत नाही. त्यामुळे ठक्करबाप्पा, जि.प.सेस, ग्रामपंचायत अंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## कोक ते कोडेगाव (जि.परभणी) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१९) * १५५६ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील कोक ते कोडेगाव या ८ कि.मी. रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील ८ कोटी रुपये खर्च करण्यात आले असताना सद्य:स्थितीत एक वर्षाच्या आतच या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासबंधी यापुर्वी चौकशीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले असुन या चौकशी अहवालात सदर रस्त्यावरुन जडवाहनांची वाहतुक होत असल्याने रस्त्याची दुरवस्था झाल्याचे नमुद केले परंतु वस्तुस्थितीत सदर ठेकेदाराने या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे जिल्हयातील समाजसेवी संघटनांच्या प्रतिनिधींनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशतः खरे आहे.

सदर रस्त्याच्या डांबरीकरण झालेल्या एकुण १५.९८० कि.मी. लांबीपैकी ०/५०० ते ३/१०० या एकुण २.५० कि.मी. रस्ता राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामासाठी होणाऱ्या अतिभार क्षमतेच्या वाहतुकीमुळे खराब झाला आहे.

(२) सदर रस्त्याच्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे हे खरे आहे.

तथापि, सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले हे खरे नाही. सदर कामाची प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळया १३ राज्य गुणवत्ता निरिक्षकांनी तपासणी केली असून त्यांनी कामाची गुणवत्ता समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.

(३) सदर रस्त्याच्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी परभणी यांनी निकृष्ट दर्जाच्या कामाची गुणवत्ता नियंत्रक यांच्या माध्यमातून चौकशी करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार राज्य गुणवत्ता समन्वयक (प्रमंग्रासयो), पुणे यांना सदर कामाची चौकशी करणेबाबत कळविले आहे. राज्य गुणवत्ता समन्वयक यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया जिल्हा मानव विकास निर्देशांकामध्ये मागास असल्याबाबत

**(२०) * २६६ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया हे जिल्हे मानव विकास निर्देशांकामध्ये मागास असून सर्वाधिक प्रभावित असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यपाल महोदयांनी मानव विकासाचा मानक बनलेल्या तीन बिंदूंच्या विकासावर खर्च करण्याकरिता ५० कोटींचा निधी दिला असून सदर निधी अद्यापही अखर्चीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राप्त निधी मानव विकासाचा मानक बनलेल्या तीन बिंदूंच्या विकासावर खर्च करण्याचा कालावधी किती आहे, त्यानुसार निधी खर्च करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, सदर निधी अद्यापही उपयोगात न आणण्याचे प्रमुख कारण काय आहे ?

**श्री. अजित पवार :** (१), (२) व (३) विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया हे जिल्हे मानव विकास निर्देशांकामध्ये मागास असल्याची बाब खरी आहे.

मा.राज्यपाल महोदयांचे निदेशाप्रमाणे, नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक २३ जुलै, २०१९ अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या ३ विकास मंडळांकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता प्रत्येकी रू.५० कोटी इतका “विशेष निधी” मंजूर करण्यात आला आहे. या ३ विकास

मंडळांनी रु.५० कोटी “विशेष निधी” मानव विकास कार्यक्रम अंतर्गत निर्दिष्ट क्षेत्रांमध्ये मानव विकास निर्देशांक वृद्धींगत होण्याच्या दृष्टीने “जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना” करिता पूरक स्त्रोत म्हणून वापरणे अभिप्रेत आहे.

नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक २३ जुलै, २०१९ नुसार जिल्हाधिकारी यांनी “प्रशासकीय मान्यता” दिलेल्या कामांनाच शासनाकडून निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजने अंतर्गत करण्यात आलेल्या कंपार्टमेंट बंडिंगच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२१) * ७५२० श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सोलापूर जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाकडून जलयुक्त शिवार योजने अंतर्गत प्रत्येक तालुक्यात कंपार्टमेंट बंडिंगची कामे करण्यात आली असता या कामांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याच्या अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या असून या गैरव्यवहारांमध्ये जिल्हा कृषी अधिकारी यांचाही सहभाग असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जलयुक्त शिवार योजने अंतर्गत करण्यात आलेली कंपार्टमेंट बंडिंग कामे अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाची झाली असून तालुका कृषी अधिकाऱ्यांनी एमबी रजिस्टरमध्ये बनावट नोंदी केल्या असताना याकडे जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनीही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत मक्तेदाराशी संगनमत करुन देयके अदा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात जिल्हा कृषी कार्यालयामार्फत तीन वर्षात झालेल्या कंपार्टमेंट बंडिंग कामाची चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यावहारातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील आरफळ कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२२) * २८९८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील आरफळ कालव्याची गेल्या वीस वर्षात कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यात आली नसल्याने कालव्याची गळती होऊन लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आवर्तन सुरु झाले की मुरुम व दगड टाकून तात्पुरती दुरुस्ती केली जात असुन लाखो रुपये खर्च करुन बांधलेल्या आरफळ व ताकारी योजनेच्या कालव्याची दुरुस्ती करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कालव्यांची पाहणी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही.

आरफळ कालव्याचे सांगली जिल्हयातील कि.मी.१०२ ते १९१ कि.मी.लांबीचे काम तसेच पलूस शाखा कालवा कि.मी.० ते २३ चे काम सन २००९-१० मध्ये पूर्ण झाले आहे. मुख्य कालव्याचे कि.मी.१०२ ते १७६ कि.मी. मधील व पलूस शाखा कालव्याचे अस्तरीकरण पूर्ण झाले असून मुख्य कालवा कि.मी.१७६ ते कि.मी.१९१ मधील अस्तरीकरण कामे प्रगतीत आहेत.

सदर कालव्यातून सकृतदर्शनी कोणत्याही प्रकारची गळती होत नसून, पाणी वितरणासाठीच्या विमोचकाच्या दरवाजातून काही प्रमाणात गळती होते.
(२) हे खरे नाही.

तथापि, आरफळ व ताकारी कालव्यावरील विमोचकातून काही प्रमाणात गळती होत असल्याने आवर्तन कालावधीत गळती रोखणेसाठी आवश्यकतेनुसार गेटच्या मुखाशी मुरुम / माती याचा वापर केला जात होता.
(३) कालव्याची पाहणी नियमितपणे केली जाते.
(४) आरफळ व ताकारी कालव्यावरील विमोचकांतून काही प्रमाणात होणारी गळती रोखण्यासाठी स्लुईस व्हॉल्व बसविणेची कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात एचआयव्हीच्या थर्ड लाईन औषधांचा नियमित पुरवठा करण्याबाबत

**(२३) * ४९०२ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात थर्ड लाईन औषधांसाठी एआरटीची केवळ ६ केंद्रे असून तेथे रुग्णांना ७ ते ८ गोळयाच दिल्या जात असल्याची बाब जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-टेंडरिंगची प्रक्रिया रखडल्यामुळे दीड महिन्यांपासून राज्यात एचआयव्हीच्या थर्ड लाईन औषधांचा पुरवठा होत नसल्याने नॅशनल एड्स कन्ट्रोल ऑर्गनायझेशनने (नॅको) एचआयव्हीचे औषध जिल्हास्तरावरच खरेदीचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रुग्णांना नियमित औषध पुरवठा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात नॅकोच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ९१ एआरटी केद्रांमार्फत रुग्णांवर औषधोपचार केले जातात. सदर औषधे केंद्र शासनाकडून दिली जातात. दोन केंद्रांवर औषधांचा तुटवडा होता, परंतु उपलब्ध साठयातून पंधरा दिवसांकरीता औषधे दिली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

थर्ड लाईन औषधे पुरविण्यासाठी नॅकोमार्फत विलंब होणार असल्याने सदर औषधे राज्य पातळीवर खरेदी करण्यास उक्त संस्थांना परवानगी दिली त्यानुसार नोव्हेंबर, २०१९ अखेरीस एआरटी केंद्रांना निधी वितरीत केला.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर चित्रनगरीतील दुसऱ्या टप्प्यातील कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * ३४५४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील जयप्रभा आणि शालिनी हे दोन्ही स्टुडिओ काळाच्या ओघात अद्ययावत नसल्याने बंद पडले असल्याने मोरेवाडी येथील उपलब्ध ७५ एकर जमिनीच्या आवारात चित्रनगरीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर चित्रनगरी नव्याने विकसीत करण्याकरिता पहिल्या टप्प्यात १२ कोटी व दुसऱ्या टप्प्यात १६ कोटी याप्रमाणे निधीचे वितरण करूनही सदरील काम संथगतीने सुरू असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर चित्रनगरीकडून सांस्कृतीक विकासाला चालना देण्याकरिता प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पहिल्या टप्प्यांतर्गत एकूण १७ कामांसाठी अंदाजित एकूण खर्च रु.१७.०३ कोटी यास मान्यता देवून रक्कम रु.१६.०८ कोटी वितरीत करण्यात आलेली आहे. पहिल्या टप्प्यांतर्गत १७ कामे पूर्ण करण्यात आली असून सद्य:स्थितीत कोल्हापूर चित्रनगरीमध्ये एकूण १८ चित्रिकरण स्थळे चित्रिकरणासाठी उपलब्ध आहेत.

दुसऱ्या टप्प्यांतर्गत कामाच्या रु.३,३९,१७,७४७/- इतक्या अंदाजपत्रकास मान्यता देवून रु.१.८० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. दुसऱ्या टप्प्यांतर्गत एक टॉक शो स्टुडिओ शेड १०० X ९० फूट बांधणे (वातानुकूलीत यंत्रणेसहीत), ६ मेकअप रुम बांधणे (वातानुकूलीत यंत्रणेसहीत), ६ स्वच्छतागृहे बांधणे, चित्रीकरण साहित्य ठेवण्याकरीता गोडाऊन बांधणे आणि या सर्व ठिकाणी विद्युतीकरण करणे इ. कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून लवकरच कामांना सुरुवात करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बामणोद-वनोली (ता.यावल, जि.जळगाव) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(२५) * ५२८९ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर मतदार क्षेत्रातील बामणोद-वनोली (ता.यावल, जि.जळगाव) रस्त्याचे काम सी.एम.जी.एस.वाय अंतर्गत मंजूर करण्यात आलेले असून सदर काम संथ गतीने सुरु असून निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्यासह सदरहू रस्त्याचे काम जलद गतीने चांगल्या दर्जाचे होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

सदर काम मंद गतीने सुरू नसून निविदा अटी व शर्ती नुसार कामाची प्रगती आहे.
या योजनेंतर्गत मंजूर कामांची तपासणी करण्याची स्वतंत्र त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित आहे. सदर कामाची ३ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी वेळोवेळी तपासणी केली आहे.

त्यांनी सदर कामास समाधानकारक शेरा दिला आहे.
(२) या योजनेंतर्गत मंजूर कामांची तपासणी करण्याची स्वतंत्र त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित आहे. सदर कामाची ३ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी वेळोवेळी तपासणी केली आहे.त्यांनी सदर कामास समाधानकारक शेरा दिला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कोळदे (ता.जि.नंदुरबार) येथील आदिवासी विद्यार्थ्यांमधील वाढत्या सिकलसेल आजाराबाबत

**(२६) * ६९९३ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोळदे (ता.जि.नंदुरबार) येथील अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी केली असता ६० विद्यार्थी सिकलसेल या आजाराने ग्रस्त असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांमधे सिकलसेल या आजाराचे प्रमाण वाढण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या रुग्ण विद्यार्थ्यांना विशेष सुविधा देण्यासह तातडीने उपचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
(२) सिकलसेल आजार हा अनुवंशिक आहे. आई-वडील दोघेही सिकलसेल रुग्ण, किंवा वाहक-पिडीत, वाहक-वाहक असल्यास त्यांच्या अपत्यांना हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. आदिवासी समुदायात याचे अधिक प्रमाण दिसून येते.
(३) अशा रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहे:-

अ) महाराष्ट्रातील २१ जिल्हयांमध्ये सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतो. त्याअंतर्गत सिकलसेल रुग्णांना मोफत निदान, गरजे प्रमाणे रक्तसंक्रमण व औषधोपचाराची सुविधा शासकीय रुग्णालयात दिली जाते. प्रत्येक जिल्हा रुग्णालयात डे केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

ब) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सिकलसेल रुग्णांच्या औषधोपचार सुविधेचा समावेश आहे.

क) सीकलसेल रुग्णांना औषधोपचाराकरीता निवासी गावापासून ग्रामीण/ उपजिल्हा/ जिल्हा रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/ रुग्णालय येथे उपचाराकरीता १५० कि.मी. पर्यंतच्या प्रवासाकरीता सवलत देण्याबाबत शासन निर्णय पारित करण्यात आला आहे.

ड) जिल्हा रुग्णालयात स्वतंत्र डे-केअर सेंटर मध्ये रुग्णांचे निदान, उपचार व निगा राखण्याबाबत तसेच विवाहयोग्य रुग्णांना आजारग्रस्त, वाहक यांनी आपआपसात लग्न करु नये याबाबत विवाहपूर्व समुपदेशन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इगतपुरी व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील सिंचन प्रकल्पांच्या धरण व कालवा दुरुस्तीच्या कामांबाबत

**(२७) * ४६५३ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यात अनेक मोठे, मध्यम व लघु सिंचन प्रकल्प असून या प्रकल्पांना मोठया प्रमाणात गळती लागली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील पाटबंधारे व कालव्यांची देखील दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने या दुरुस्तीस झालेला मागील खर्चाचा तपशील घेऊन येथील प्रकल्पांच्या धरण व कालवा दुरुस्तीच्या कामांना त्वरीत निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही,

जलसपंदा विभागंतर्गत इगतपूरी आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यात ४ मोठे, १ मध्यम व १० लघु असे एकुण १५ पुर्ण झालेले प्रकल्प आहेत. सदर प्रकल्पाच्या धरण भिंतीमधून कोणत्याही प्रकारची गळती नसून या प्रकल्पांच्या सिंचन विमोचक द्वारे/आपात्कालीन द्वारे यातून किरकोळ स्वरुपाची गळती आहे.

(२) १) १० लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या सिंचन विमोचक द्वारे/आपत्कालीन व्दारे यातील गळतीची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच मोठे/मध्यम प्रकल्पांच्या गळती दुरुस्तीकरिता आवश्यक कामे सन २०१९-२० मध्ये विशेष दुरुस्तीतंर्गत प्रस्तावित आहेत.

२) इगतपुरी/त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांच्या दुरुस्तीची कामे गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळास प्राप्त होणाऱ्या सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीतून करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाघरे (ता.पारोळा, जि.जळगांव) ग्रामपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२८) * ७६६२ श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघरे (ता.पारोळा, जि.जळगांव) ग्रामपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेत गावातील गरजू व गरीब ग्रामस्थांना डावलून बोगस लाभार्थ्यांची यादी तयार करुन संबंधित ग्रामसेवक, घरकुल विभाग पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचारी यांनी गैरव्यवहार केल्याची तक्रार ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती, पारोळा यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवीन घरकुल न बांधता जुन्याच घरांना रंगरंगोटी करुन शासनाची फसवणूक करुन गैरव्यवहार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, त्यानुसार या गैरव्यवहारातील संबंधितांवर कारवाई करण्यासह गरजूंना या योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे वाघरे (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील ग्रामस्थांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बोगस व न बांधलेल्या घरकुलांची चौकशी

होणेबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रकरणाची चौकशी करण्याकरीता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव, जि.जळगांव यांच्या आध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली असून सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सौंदळी हिरापूर (ता. दर्यापूर, जि. अमरावती) येथील मुख्य रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२९) * २१४५ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौंदळी हिरापूर (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथील मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी खड्डे पडले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील पडलेल्या मोठ्या खड्यांमुळे वाहनधारक आणि प्रवाश्यांना प्रवास करणे गैरसोयीचे होत असुन सदरहू मार्गावर अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्नांकित रस्ता हा सामदा-सौदळी-टोगलाबाद धामोडी-हिंगणी-पनोरा ते राज्य मार्ग क्र. २८२ ला जोडणारा इतर जिल्हा मार्ग क्र. २५ आहे. या रस्त्याची एकूण लांबी २२ कि.मी. आहे. त्यापैकी प्रश्नाधीन सौंदळी ते राज्य मार्ग ३१२ (सौंदळी हिरापूर मुख्य रस्ता) हा १ कि.मी. रस्ता डांबरीकरण झालेला आहे. सदर रस्त्याचा गावाकडील ३०० मीटर लांबीचा पृष्ठभाग खोलगट उतारावर असल्याने पावसाळ्यात शेतातील पावसाचे पाणी

रस्त्यांच्या पृष्ठभागावरुन वाहत असल्यामुळे पृष्ठभाग खराब होतो. त्यामुळे या लांबीमध्ये कॉंक्रीट पेव्हमेंट घेणे व उर्वरीत ७०० मीटर लांबीचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ मध्ये जिल्हा वार्षिक योजनातर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या अधिन राहून या रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यातील खाजगी हॉस्पीटल, नर्सिंग होम व डायग्नोस्टीक सेंटर्संना 'महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल' च्या अधिपत्याखाली आणण्याबाबत

**(३०) * ५९३३ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी हॉस्पीटल, नर्सिंग होम व डायग्नोस्टिक सेंटर आरोग्य सेवा पुरविणाऱ्या खाजगी संस्थांना 'महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल' कायद्याअंतर्गत आणण्यासाठी शासनाने ४ तज्ज्ञ सदस्यांची समिती नेमलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तज्ज्ञ समितीने सुमारे सहा महीने खाजगी हॉस्पीटल व नर्सिंग होम मधील डॉक्टरांच्या विरोधात येणाऱ्या तक्रारी विचारात घेवून आपला अहवाल तयार करुन सदर अहवाल मेडीकल कॉन्सिलने राज्य शासनाला सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील महत्वपूर्ण शिफारशी कोणत्या आहेत, तद्नुषंगाने अहवालातील शिफारशींनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील खडकवासला, पानशेत, वरसगाव व टेमघर धरणातील गाळ काढण्याबाबत

**(३१) * ७४७६ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खडकवासला, पानशेत, वरसगाव व टेमघर धरणातून पुणे व पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या धरणांमध्ये असलेल्या गाळामुळे या धरणांची अंदाजे ५ ते ६ टीएमसी साठवण क्षमता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व त्यानुसार पूर्णपणे गाळ काढून टाकण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) खरे आहे.

खडकवासला, पानशेत, वरसगाव व टेमघर धरणातून पुणे शहराला पाणीपुरवठा होतो व पवना धरणातून पिंपरी चिंचवड शहरास पाणी पुरवठा होतो.

(२) हे खरे नाही. मेरी नाशिक यांनी सन २००७ मध्ये केलेल्या गाळ सर्वेक्षणा नुसार खडकवासला धरणामध्ये गाळ नाही. वरसगाव धरणामध्ये २.१२ दलघमी गाळ आहे. पानशेत धरणामध्ये २८.४२ दलघमी (अंदाजे १ टीएमसी) इतका गाळ असल्याचे नमूद केले आहे.

(३) धरणातील गाळ काढुन साठवण क्षमता पुनर्स्थापित करणे व काढलेला गाळ शेतात पसरवणे संदर्भात ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्र.गामुध-२०१७/प्र.क्र.१३४/जल-०१, दि.०६ मे, २०१७ नुसार गाळ मुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविण्यात येत आहे.

तसेच प्रायोगिक तत्वावर राज्यातील ०५ मोठ्या धरणातील गाळ व गाळ मिश्रित वाळू/रेती काढणेबाबत जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र.मेरीना-२०१८/प्र.क्र.१३७/१८/ लाक्षेवि आस्था दि.०३/०८/२०१८ अन्वये धोरण निश्चित केलेले आहे. तथापि या शासन निर्णया मध्ये सदर धरणातील गाळ काढण्याचा समावेश केलेला नाही.

तथापि प्रतिवर्षी पानशेत धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याचे उपलब्ध परिमाणाचे अवलोकन केले असता जिवंत साठयामध्ये (Live Storage) घट झालेली दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३२) * ५७०२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील जिल्हा परिषद शाळांमधील ९४२ वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून त्या कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे दिनांक ८ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या शाळांमधील सुमारे ३० हजार विद्यार्थी जिवितास धोका पत्करुन शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या जिल्हयातील शाळांचा आढावा शासनाने घेतला आहे काय, त्यानुसार निधीची तरतूद करुन या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद शाळेतील मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यातील विद्यार्थ्यांची शिक्षणाकरिता गावातील ग्रामपंचायत इमारत, समाजमंदिर तसेच शाळेतील उपलब्ध वर्गखोल्यात पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) सन २०१८-१९ मध्ये ३५८ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा सेस फंडातून रु.११९५.७८ लक्ष रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच, ५२ नविन

वर्गखोल्यांसाठी रु.३६४.०० लक्ष मंजूर करण्यात आले असून सदरहू कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१९-२० मध्ये सर्व शिक्षा अभियानातर्गत ५० वर्ग खोल्यांसाठी रु.१५१.०६ लक्ष मंजूर करण्यात आले आहेत. सन २०१९-२० मध्ये जिल्हा नियोजन समितीकडून ३३७ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी रु.१०००.०० लक्ष व १४५ नविन वर्गखोल्याबांधकामासाठी रु.१०००.०० लक्ष मंजूर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीत बेकायदा सेट उभारल्याने महामंडळाचे झालेले आर्थिक नुकसान

**(३३) * २६३४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोरेगाव (पूर्व) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीत बेकायदा एक कोटीचा सेट उभारल्याने महामंडळाचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी दोन वर्ष होऊनही अद्याप दोषींविरुध्द शासनाने तथा महामंडळाने कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनधिकृत सेटमुळे महामंडळाचे प्रति दिन ४० हजार रुपये भाडे याप्रमाणे २ ते ३ कोटी रुपये महसूली उत्पन्नाचे आर्थिक नुकसान झाले असतानाही सदर प्रकरणी शासनाने तथा महामंडळाने दोषींविरुध्द अद्याप कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी दोषींविरुध्द कारवाई करुन त्याचेकडून नुकसान भरपाई वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरात चित्रिकरणासाठी बाह्य तसेच अंतर्गत चित्रिकरण स्थळे उभारणे ही नित्याची व आवश्यक बाब असल्याने चित्रिकरण स्थळांच्या उभारणीबाबत २०१६ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेची वेगळ्याने मान्यता घेण्यात येत नव्हती. पूर्वापार प्रचलित कार्यपध्दतीनुसार

पोलिस स्टेशन/कार्यालय या चित्रिकरण स्थळाचे काम शासनाचे उत्पन्नात भर पडण्याच्या उद्देशाने तसेच चित्रपट उद्योगाला उभारणी मिळण्याच्या दृष्टीने जून, २०१६ मध्ये सुरु करण्यात आले होते. तथापि महानगरपालिकेने दि.०६.०४.२०१७ रोजी दिलेल्या नोटीसीनुसार काम थांबविण्यात आले.

सदर बाब ही चित्रनगरीत उभारण्यात येणाऱ्या चित्रिकरण सेटस् पुरतीच मर्यादित नसून इतर निर्मात्यांकडून उभारण्यात येणाऱ्या चित्रिकरण सेटशीही संबंधित आहे व ही बाब महामंडळास व्यावसायिकदृष्टया हानीकारक असल्याने महानगरपालिकेकडे याबाबत पाठपुरावा करण्यात आला. त्यानुसार चित्रिकरणाशी संबंधित बांधकामांबाबत महानगरपालिकेकडून दि.११.०९.२०१९ पासून स्वतंत्र नियमावली लागू करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दि.१८.१२.२०१९ रोजी पोलिस स्टेशनच्या सेटच्या कामास मान्यता देण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर करण्यात आला आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता महानगरपालिकेकडून मान्यता घेण्यात येत आहे.

चित्रनगरीने केलेल्या बांधकामावर महानगरपालिकेने हरकत घेतल्यामुळे चित्रिकरणासाठी उभारण्यात येत असलेले पोलीस स्टेशनचे काम बंद करण्यात आले. त्यामुळे सदर स्थळ चित्रिकरणासाठी उपलब्ध होऊ न शकल्याने त्यातुन अपेक्षित उत्पन्न सुरु होऊ शकलेले नाही. तथापि, सदरची कृती ही शासनाच्या उत्पन्नात वाढ होऊन चित्रपट निर्मिती संस्थांना आवश्यकतेनुसार नव्याने चित्रिकरण स्थळे उपलब्ध करुन देण्याच्या सदहेतुने (in good faith) केलेली असल्याने महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील तालुका आरोग्य कार्यालयाची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(३४) * ७७७५ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील तालुका आरोग्य कार्यालयाची इमारत जुनी झाली असून धोकादायक बनली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोकादायक इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांच्या जिवीतास धोका असतानाही काम करावे लागत असल्याने या ठिकाणी नवीन इमारत उभारावी अशी मागणी कर्मचाऱ्याकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त धोकादायक इमारतीची पाहणी शासनाने केली आहे काय, तद्नुसार तालुका आरोग्य कार्यालयाची नविन इमारत बांधण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

औढा नागनाथ येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयास स्वत:ची स्वतंत्र इमारत नसून हे कार्यालय सध्या ग्रामीण रुग्णालयाच्या रिक्त झालेल्या जुन्या इमारतीत कार्यरत आहे. सध्या या इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक असून ती धोकादायक बनलेली नाही.
(२) हे खरे नाही.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाची इमारतीची दुरुस्ती करावी अशी मागणी तालुका आरोग्य अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडे केली आहे.
(३) सदरील इमारत धोकादायक झाली नसून, इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक स्तरांवर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयासाठी प्लेटलेट्स अफेरेसिस यंत्र उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) * ३४७६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयासाठी प्लेटलेट्स अफेरेसिस यंत्र (Platelet Apheresis Machine) उपलब्ध करुन देण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लेटलेट्स अफेरेसिस यंत्र उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) सदर यंत्रसामुग्री खरेदीचे पुरवठा आदेश दिनांक २६.०२.२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घुंगशी बॅरेज (जि.अकोला) मधील पाणी दुषित झाल्याबाबत

**(३६) * ४७७९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील पुर्णा नदीवर बांधण्यात आलेल्या घुंगशी बॅरेज मधील पाणी हिरवेगार व दुषित झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घुंगशी बॅरेजमध्ये माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अडविण्यात आलेले पाणी दुषित झाले असल्याने पिण्या व सिंचना योग्य नसल्याने स्थानिक लोकप्रतीनिधींनी सदरहू बाब पाटबंधारे खात्याच्या निदर्शनास आणून तपासणी करुन उपाययोजना करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय,

(३) घुंगशी बॅरेजमधील पाण्याचे नमुने तपासणीसाठीची कार्यवाही करणेबाबत उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अकोला यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील वैनगंगा नदीवरील 'कोटगल बॅरेज' चे काम सुरू करण्याबाबत

**(३७) * ३०९५ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील वैनगंगा नदीवर कोटगल गावाजवळ 'कोटगल बॅरेज' सिंचन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असुन या प्रकल्पाला वित्त विभागाच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये रुपये ५ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत गडचिरोली जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत माहे जुलै व ऑगस्ट, २०१७ पासून झालेल्या लोकशाही दिनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत सदरहू प्रकल्पाचा विषय चर्चेला आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाची निविदा प्रक्रिया दोनदा राबविण्यात आली असतानाही अद्याप पर्यंत या सिंचन प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हयाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असणाऱ्या या सिंचन प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करण्यासह विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय. दि.२७ ऑक्टोंबर २०१६ रोजीच्या पत्रान्वये आकस्मिक निधीतून रू.५ लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

(२) जुलै-ऑगस्ट २०१७ या कालावधीतील लोकशाही दिनी सदर प्रश्न चर्चेला आला नाही.

(३) या बॅरेजच्या मुख्य बांधकामाकरीता फक्त एकदाच निविदा काढण्यात आलेली असून त्याअन्वये निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून कंत्राटदारास कार्यरंभ आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे व बॅरेजचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे.

(४) या प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकामास माहे जानेवारी, २०२० ला सुरुवात करण्यात आली असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) * ४९७३ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा परिषदअंतर्गत ग्रामीण मार्ग १६४१ तर जिल्हा मार्ग ३४८५ किलोमीटरचे आहेत असे एकूण जिल्हयात जिल्हा परिषदेकडे ५१२६ किलोमीटर ग्रामीण रस्ते असून या रस्त्यांपैकी १४५१ किलोमीटरच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागाचा विकासाचा मार्ग असणाऱ्या या रस्त्यांची दुरवस्था झाली असून हे रस्ते दुरुस्त करण्यासाठी तसेच ग्रामीण मार्गावरील २५ पुलांचे बांधकाम करण्यासाठी ५५ कोटींची गरज असल्याने याबाबतीत वारंवार मागणी करुनही अद्यापही निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूर जिह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरुस्ती व या मार्गावरील पुलांच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन सदरहू रस्ते पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे. तथापि, लातूर जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग ३४८५ कि.मी. व इतर जिल्हा मार्ग १६४१ कि.मी. असे एकूण ५१२६ कि.मी. ग्रामीण रस्ते आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधीचे वाटप जिल्ह्यातील रस्त्यांची लांबी व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी लातूर जिल्हा परिषदेस रु.६७२.६५ लक्ष व सन २०१८-१९ मध्ये रु. ८२२.०५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

-----------------

## मौजे वडद व साखरी बुद्रुक (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या गावांतील शेतकऱ्यांच्या सात बारावरून पाझर तलावाच्या नोंदी कमी करण्याबाबत

**(३९) * २०१४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडद व साखरी बुद्रुक (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या गावांत सन १९८३ साली पाझर तलाव मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३६ वर्षात पाझर तलावांच्या कामांसाठी शासनाने निधीच न दिल्याने ७/१२ वर करण्यात आलेल्या नोंदी रद्द कराव्यात, अशी मागणी पाझर तलावांसाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुहागर पंचायत समितीच्या आमसभेमध्ये केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे वडद ता.गुहागर येथील पाझर तलावास जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडील सर्वसाधारण ठराव क्र. १८२६ दि.१४/०८/१९९० अन्वये रु.६.१२ लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन या पाझर तलावाचे काम सन १९९२ मध्ये जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून पुर्ण करणेत आलेले आहे. तसेच साखरी बु. येथील पाझर तलावाचे काम रोजगार हमी योजनेतून मंजूर झाले असून या पाझर तलावाच्या पायाकडील जलरोधी खंदकाची खोदाई व पुनर्भरणाचे काम अंशत: करण्यात आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक ७.१.२०१९ च्या गुहागर पंचायत समितीची सन २०१७-१८ या वर्षाच्या आमसभेच्या इतिवृत्तातील विषय क्र. २ (१०) नुसार मागणी दिसून येते.

(३) वडद पाझर तलावाचे काम पूर्ण झालेले आहे व साखरी बु. पाझर तलावाचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या ७/१२ वर करण्यात आलेल्या नोंदी रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुळशी (जि.पुणे) धरणाचे पाणी राखीव ठेवण्याबाबत

**(४०) * ६८०३ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) धरणाचे वीज निर्मितीनंतर समुद्रात वाहून जाणारे पाणी पुणे शहर व ग्रामीण भागाला द्यावे अशी मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पाणी राखीव ठेवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली असून त्याबाबत बैठका देखील घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी राखीव ठेवण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहास वीजनिर्मीतीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या कोकण खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरीता शासन निर्णय दि. २.८.२०१८ अन्वये श्री.अ.पा.भावे, निवृत्त सचिव, लाक्षेवि, जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट गठित करण्यात आला होता. सदर अभ्यासगटाचा अहवाल शासनास दि. २७.५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे.

कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहास वीजनिर्मीतीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या कोकण खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करणेबाबत उपरोक्त भावे समितीच्या अहवालाचा अभ्यास करून शासनास पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चीत करून शासनास सल्ला देण्यासाठी शासन निर्णय दि. २.८.२०१९ अन्वये तज्ञ समिती (सुर्वे समिती) गठित करण्यात आली आहे. सदर तज्ञ समितीची कार्यवाही प्रगतीत असून तज्ञ समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हत्ती रोगाचे समूळ उच्चाटन करण्याबाबत

**(४१) * ३३३० श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतात हत्तीरोगाचे मोठे प्रमाण असून २१ राज्यातील २५६ जिल्ह्यांमध्ये त्याची व्याप्ती असून महाराष्ट्रात नागपूर, गडचिरोली व चंद्रपूरसह १८ जिल्ह्यांमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यव्यापी मोहिमेत अंडवृध्दी झालेल्या व हत्त्तीरोगांचा आजार असलेल्या २० हजार रुग्णांची नोंद केली असुन यामध्ये मराठवाडा व विदर्भातील आठ जिल्हयात अंडवृध्दीच्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या आजाराला प्रतिबंध घालण्याकरिता माहे फेब्रुवारी व नोव्हेंबर, २०१९ या दोन महिन्यात राज्यात व्यापक सर्वेक्षण घेतले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्वेक्षणात काय आढळून आले, तद्नुसार हत्ती रोगाचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १ ते १४ डिसेंबर २०१९ या कालवधीमध्ये हत्तीरोग रुग्णाचे सर्वेक्षणात राज्यात एकूण १६,४२९ अंडवृध्दी रुग्णांची व ३४,०६४ बाहयलक्षणेयुक्त (हत्तीपाय) रुग्णांची नोंद झाली असुन त्यापैकी एकूण १४,९०६ अंडवृध्दी रुग्ण मराठवाडा व विदर्भातील आठ जिल्हयात आहेत.

(३) हे खरे नाही.

राज्यात १५ ते ३० जुलै २०१९ व १ ते १४ डिंसेबर २०१९ या कालावधीमध्ये हत्तीरोग रुग्णांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(४) अंडवृध्दी रुग्णांच्या शस्त्रक्रीया करुन घेण्यासाठी राज्यस्तरावरुन मोठया प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. जिल्हा व तालुका स्तरावर शिबिराचे आयोजन करुन जास्तीत जास्त अंडवृध्दी रुग्णांच्या शस्त्रकिया करुन घेण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

विदर्भ व मराठवाडयातील आठ जिल्हयातील शासकीय वैद्यकिय महाविदयालयातील सर्जन व भुलतज्ञ यांची सेवा उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. तसेच खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांचाही (सर्जन) शस्त्रकिया शिबिरामध्ये सहभाग घेतला जात आहे.

• राज्यातील एकुण ५३४१ अंडवृध्दी शस्त्रकियापैकी विदर्भ व मराठवाडयातील आठ जिल्हामधील ४५५८ अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

• हत्तीरोग रुग्णांसाठी मोर्बिडिटी क्लिनिक मध्ये पायाची काळजी घेण्याविषयी माहिती सांगण्यात येते तसेच प्रात्यक्षिक करुन दाखविले जाते.

• सध्या राज्यातील विशेषत: मराठवाडा व विदर्भातील आठ जिल्हयांमध्ये सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबविण्यात येत आहे.

• डासोत्पती स्थानाची गणना करुन डासोत्पती स्थानावर अळीनाशक फवारणी करणे तसेच किरकोळ अभियांत्रिकी पध्दतीने डासाेत्पती स्थाने नष्ट करणे तसेच डास निमुर्लनासाठी जनजागृती करणे इत्यादी उपाययोजना करण्यात येतात

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदुरबिस्वा (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील कब्रस्तानकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(४२) * २२५५ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबिस्वा (बिस्वा ब्रीज) (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील कब्रस्तानकडे जाण्यासाठी विश्वगंगा नदीच्या पात्रामधून जावे लागत असल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षांपासून सदर रस्त्यावर पुलाचे बांधकाम न झाल्याने कब्रस्तान मध्ये जाताना गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार चांदुर बिस्वा येथील कब्रस्तानकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) चांदूरबिस्वा येथील कब्रस्तानकडे जाणारा रस्ता हा योजनाबाह्य रस्ता असल्यामुळे येथे शासनाच्या योजनेतून पुलाचे काम घेता येत नाही. त्याकरीता सदर रस्ता रस्ते विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदेस सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## कुकडी प्रकल्पापासून समुद्राकडे वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळवून शेतीला देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४३) * ७३८४ श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पापासून मोठया प्रमाणात पावसाचे पाणी पश्चिम घाटामार्गे समुद्राकडे वाहून जात असणारे पाणी पूर्वेकडे वळवून शेतीला देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, प्रस्तुत प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) नाही.

तथापि शासन पत्र दि.९.७.२०१९ अन्वये कुकडी खोऱ्यालगत कोकणामध्ये वाहून जाणारे पाणी पूर्वेकडील कुकडी व इंद्रायणी खोऱ्यात वळविणेबाबतच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

(२) कुकडी खोऱ्यालगत कोकणामध्ये वाहून जाणारे पाणी पूर्वेकडील कुकडी व इंद्रायणी खोऱ्यात वळविणेबाबतच्या प्रस्तावास शासन पत्र दि.९.७.२०१९ अन्वये सदर योजनेस प्रथम मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांच्याकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे तद्नंतर

योजनेचा प्राथमिक अन्वेषण अहवाल तयार करून त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेणे व सदरील बाबींची पूर्तता झालेनंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे या अटींवर तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील राज्य कामगार विमा महामंडळाचे रुग्णालय पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(४४) * ५८७२ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील राज्य कामगार विमा महामंडळाच्या रुग्णालयात दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास लागलेल्या आगीच्या घटनेला एक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप रुग्णालय पूर्ववत सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयातील काही विभाग बंद असून रुग्णालयात सोयी सुविधांचा अभाव असल्याने जोगेश्वरी-अंधेरीतील रुग्णांना अन्य खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याने रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त रुग्णालय तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी राज्य कामगार विमा रुग्णालय, कांदिवली यामार्फत उपचार पुरविण्यात येत आहेत. तसेच, अतिविशिष्ट सेवा या राज्य कामगार विमा महामंडळाने टाय-अप केलेल्या खाजगी रुग्णालयांमार्फत देण्यात येत आहेत. खाजगी रुग्णालयात उपचारासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय केली जाते.

(३) व (४) अंधेरी (ई.एस.आय.सी.) रुग्णालय हे राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत असून राज्य शासनाचे त्यावर प्रत्यक्ष नियंत्रण नाही. याबाबत, अप्पर आयुक्त, क्षेत्रिय कार्यालय, राज्य कामगार विमा महामंडळ, मुंबई यांचेकडून दिनांक ०६.०२.२०२० रोजी प्राप्त पत्रानुसार राज्य कामगार विमा आदर्श रुग्णालय, अंधेरीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम एन.बी.सी.सी. इंडिया यांना देण्यात आलेले असून सदर रुग्णालयाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम जून, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलमट्टी धरणाची उंची कमी करण्याबाबत

**(४५) * ३८७४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा नदीला येणाऱ्या महापुरामुळे कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील हजारो खेडयांना पुराचा फटका बसत असून हिप्परगी ते अलमट्टी पर्यंतच्या सिमाभागातील काही भाग महापुराच्या पाण्यामध्ये बुडीत होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुढे महापुराचा फटका या तिन्ही जिल्हे व सिमाभागाला बसू नये यासाठी अलमट्टी धरणाची उंची कमी करण्याची मागणी पूरग्रस्तांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय. जुलै व ऑगस्ट, २०१९ मध्ये झालेल्या अति पर्जन्यमानामुळे पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा खोऱ्यातील नद्यांना आलेल्या महापुरामुळे कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील हजारो खेड्यांना पुराचा फटका बसला आहे. हिप्परगी ते अलमट्टी पर्यतच्या सीमाभाग हा कर्नाटक राज्याच्या हद्दीत येतो.

(२) अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) पूर विषयक सर्व बाबींचे सखोल तांत्रिक अन्वेषण करुन पूर परिस्थितीचा कारणे शोधणे, भविष्यात अशा दुर्देवी घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी उपाययोजना शोधण्याकरीता श्री.नंदकुमार वडनेरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, यांचे अध्यक्षतेखाली या क्षेत्रातील विविध तज्ञांची समिती दिनांक २३/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केली असून समितीचे कामकाज प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भायखळा (मुंबई) येथील सर जी.जी. समूह रुग्णालय व महाविद्यालय येथे अद्ययावत सुसज्ज सुपर स्पेशलिटी रुग्णालय उभारण्याबाबत

**(४६) * २८०२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील सर जी.जी. समूह रुग्णालय व महाविद्यालयातील लहान मुलांचे वॉर्ड असलेली इमारत पाडलेल्या जागेत अद्ययावत सुसज्ज सुपर स्पेशलिटी रुग्णालय उभारण्यासाठी शासनाने ६४५ कोटी निधी मंजूर करुन त्यापैकी १४५ कोटी निधी सन २०१३ मध्ये रुग्णालय प्रशासनास उपलब्ध करुन देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुपर स्पेशलिटी रुग्णालय उभारण्यासाठी रुग्णालय प्रशासनास निधी उपलब्ध करुन दिलेला असतानाही अद्याप रुग्णालय उभारणेबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तात्काळ निधी उपलब्ध करुन सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
सदर अतिविशेषोपचार इमारतीच्या बांधकामाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या विविध परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आलेली आहेत. त्यानुषंगाने इमारतीच्या आराखडयात व क्षेत्रफळात झालेल्या बदल/वाढीमुळे अतिविशेषोपचार इमारतीच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर बांधकामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. सदर इमारतीच्या बांधकामासाठी यापूर्वी रुपये १२.१२ कोटी निधी उपलब्ध करून दिला असून या आर्थिक वर्षात २५ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिवणी चोर (ता.जि.चंद्रपूर) उपसा सिंचन योजना सुरू करण्याबाबत

**(४७) * ६१३१ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवणी चोर (ता.जि.चंद्रपूर) उपसा सिंचन योजना तातडीने सुरू करण्याबाबत विधानसभा सदस्य, बल्लारपूर यांनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर उपसा सिंचन योजनेच्या संपूर्ण लाभक्षेत्राकरीताच बंद नलीकाद्वारे सिंचन प्रस्तावित असून चांदा ते बांदा उपक्रमाखालील प्रस्तावित कामास सध्याचे प्रचलीत मापदंडानुसार ५.५६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. यापूर्वी विशेष दुरूस्ती अंतर्गत कालवा प्रणालीवर रू.१०.६२ लक्ष खर्च झालेला असल्यामुळे तेथे परत संपूर्ण लाभक्षेत्रात PDN करणे ही बाब धोरणात्मक ठरत असल्याने सदर प्रस्तावास "विशेष बाब" म्हणून मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची शेरेपूर्तता करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * ५०५४ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील ३५० पैकी ८५ वर्गखोल्या या अत्यंत जीर्ण झाल्या असल्याने त्यांची तात्काळ दुरुस्ती करणे गरजेचे असून त्यातील बहुतांश वर्ग खोल्यांना तडे गेले आहेत तर काही ठिकाणी छत गळत आहेत त्यामुळे तेथील विदयार्थ्यांना जिवितास धोका पत्करुन अध्ययन करावे लागत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ६५ शाळा असून त्यापैकी जवळपास ४० ते ४५ शाळांमध्ये मुलभूत व भौतिक सुविधा नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे अशंत: खरे आहे.

जळकोट तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण ४१६ वर्ग खोल्या पैकी १३ वर्गखोल्या मोडकळीस आल्या आहेत.

तसेच, तालुक्यातील शाळातील एकूण २१३ वर्ग खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहेत.

(२) जिल्हा परिषदेच्या ६५ शाळांपैकी २९ शाळेत मुलभूत व भौतिक सुविधा नाहीत. त्यानुसार ७ शाळेत मुलांकरिता नविन स्वच्छतागृह बांधणे, ३ शाळेत मुलींकरिता नवीन स्वच्छतागृह बांधणे व १९ शाळांना नवीन संरक्षण भिंत बांधणे गरजेचे आहे.

उर्वरित ३६ शाळामध्ये मुलभूत भौतिक सुविधा शाळांमध्ये उपलब्ध आहेत.

(३) शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. जिल्हा वार्षिक योजना व केंद्रशासन पुरस्कृत समग्र शिक्षा योजनेच्या माध्यमातून सन २०१९-२० मध्ये उपलब्ध तरतुदीनुसार रु.१५८.१६ लक्ष निधी मंजुर करण्यात आला असून गरजेनुसार व निकषानुसार लागणाऱ्या उर्वरित निधीची मागणी पुढील वर्षात प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंडीवली, खोपी-पिंपळवाडी व शिरवली (ता.खेड, जि.रत्नागिरी) परिसरातील गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) * २०३४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यामध्ये कोंडीवली, खोपी-पिंपळवाडी व शिरवली या मध्यम पाटबंधारे प्रकल्पांमध्ये वर्षभर मुबलक पाणी असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असताना धरणांतील पाणी शेती आणि पिण्यासाठी शासनाकडून दिले जात नसल्याने तीनही धरणांच्या परिसरातील गावांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून धरण परिसरातील अनेक गावे व वाडयांना सद्य:स्थितीत टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धरणांमधील पाणी त्या भागातील गावांना शेती व पिण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

कोंडीवली, पिंपळवाडी व शिरवली ल.पा. प्रकल्पांमध्ये वर्षभर पाणी असते.

(२) हे खरे नाही.

प्रकल्प अहवालानुसार कोंडीवली ल.पा. योजनेमध्ये पिण्यासाठी ०.६ द.ल.घ.मी. व पिंपळवाडी ल.पा. योजनेमध्ये पिण्यासाठी ०.६९ द.ल.घ.मी. पाण्याची तरतूद आहे. शिरवली ल.पा. योजनेमध्ये पिण्याच्या पाण्याची तरतूद नाही.

पिण्याच्या पाण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आरक्षण प्रस्ताव प्राप्त झाल्यास जलसंपदा विभागाचा दि. १७/११/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करून त्यास मंजूरी देण्यात येते.

तसेच आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याची मागणी आल्यास या तिन्ही प्रकल्पातून नदीत पाणी सोडणे शक्य आहे.

(३) कोंडिवली प्रकल्पाचा मुख्य कालवा ०.३०० कि. मी. व त्यानंतर उजवा कालवा ७.८० कि. मी. लांब व डावा कालवा २.३० कि. मी. असून कालवा कामे बहुतांशी पुर्ण आहेत. परंतू शेतीसाठी मागणी नसल्याने पाणी सोडण्यात आलेले नाही.

पिंपळवाडी प्रकल्पाचा उजवा कालवा १४ कि.मी. लांब व डावा कालवा तसेच ९.०० कि.मी. लांबीचा अस्तरीकरण विरहीत असल्याने वहनव्यय टाळण्यासाठी निवडक ठिकाणी अस्तरीकरणाची कामे सुरु असल्याने व अद्याप शेतीसाठी पाण्याची मागणी नसल्याने पाणी सोडण्यात आलेले नाही.

शिरवली प्रकल्पाचा उजवा कालवा २.४० कि.मी. लांब व डावा कालवा तसेच ४.१७ कि.मी. लांबीचा असून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी पाणी सोडण्यात येत आहे.

वरील तीनही प्रकल्पांच्या बाबतीत पिण्याच्या पाण्याची मागणी झाल्यास नदीपात्रामध्ये पाणी सोडणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धरणगाव ते काळेगाव (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(५०) * २२५६ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत धरणगाव ते काळेगाव (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) या रस्त्याचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम मागील चार महिन्यांपासून बंद असून या रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे अपघाताचे प्रमाण सुद्धा वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने धरणगाव ते काळेगाव रस्त्याचे काम दर्जेदार व अंदाज पत्रकानुसार त्वरित करणेबाबत तसेच निकृष्ट काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

सदर कंत्राटदारास मानकाप्रमाणे काम करणेबाबत वेळोवेळी सुचना दिल्या आहेत. निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत DPR मधील तरतुदीनुसार काम करून घेण्यात येत आहे.
(२) डांबर वेळेवर उपलब्ध न होणे, रेतीचा तुटवडा, पावसाळा लांबल्यामुळे तसेच वळण रस्त्यास जागा नसल्यामुळे कामाची गती संथ होती तथापि अपघाताची नोंद झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) सदर कामाची २ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचेमार्फत गुणवत्ता तपासणी केली आहे.

(४) कंत्राटदारास वेळोवेळी काम गुणवत्तापुर्ण, दर्जेदार व विनाविलंब करण्याकरीता सुचित केलेले आहे. कामाची गती न राखल्यामुळे कंत्राटदाराकडून करारनाम्यानुसार रू.१,७५,४४०/- इतकी LD (नुकसानभरपाई) धावते देयकातून कपात केलेली आहे. तसेच राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी निदर्शनास आणुन दिलेल्या बाबींच्या दुरूस्त्या कंत्राटदाराकडून त्यांच्या खर्चाने करून घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेंद्र भागवत**

**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.